महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०४/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.भापोसे-३९२३/ प्र.क्र. १२३/२०२३/९-अ, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३

**विषय :-** भाप्रसे अधिकारी सेवानिवृत्त होतेवेळी शासकीय निवासस्थानाबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र शासनास सादर करण्याबाबत...

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.भापोसे-३९२३/ प्र.क्र.१२३/२०२३/९-अ, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८०२१३१५५८८२०७ असा आहे.

२. तरी, सदर परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.
विषेश पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " निवृत्तीवेतन " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**भाप्रसे अधिकारी सेवानिवृत्त होतेवेळी शासकीय निवासस्थानाबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र शासनास सादर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक:- भाप्रसे-३९२३/प्र.क्र.१२३/२०२३/९-अ**

मंत्रालय, मुंबई :- ४०० ०३२

दिनांक :- २ ऑगस्ट, २०२३

**प्रस्तावना -**

भारतीय प्रशासनिक सेवेतील अधिकारी सेवानिवृत्त होते वेळी त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण अंतिम करण्यासाठी भा.प्र.से. अधिकाऱ्यांच्या सेवाकालावधीमध्ये ते कार्यरत असलेल्या सर्व कार्यालयांकडून त्यांचे ना-देय/ ना-मागणी प्रमाणपत्र व गट विमा तपशील मागविण्यात येतो. तसेच, सदर कालावधीमध्ये ते प्रतिनियुक्तीच्या कार्यालयांमध्ये कार्यरत असल्यास सदर कार्यालयांकडून त्यांचे रजा वेतन अंशदान व निवृत्ती वेतन अंशदानाचा शासनाकडे भरणा केला आहे किंवा कसे याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिल्यांनतर भा.प्र.से. अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण अंतिम करण्यासाठी महालेखापाल कार्यालयाला सादर करण्यात येते.

शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी निवृत्तीनंतर ३ महिन्यांच्या आत शासकीय निवासस्थान रिक्त करणे आवश्यक असून सदर ३ महिन्याच्या वास्तव्याकरिता नियमित दराने भाडे आकारणी करण्यात येते. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर निवासस्थान रिक्त करेपर्यंतच्या कालावधीसाठी दंडनीय अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी करण्यात येते. काही भा.प्र.से. अधिकाऱ्यांचा सेवानिवृत्ती अथवा अन्य काही कारणांमुळे शासकीय निवासस्थानातील वास्तव्याचा अनुज्ञेय कालावधी संपुष्टात येऊनही त्यांच्याकडून शासकीय निवासस्थान रिक्त केले जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सेवानिवृत्तीवेळी शासकीय येणे बाकी असल्यास त्याची वसूली नियमानुसार सेवा उपदानातून करण्यात येते. तथापि, सेवानिवृत्त होणाऱ्या भा.प्र.से. अधिकाऱ्यांचे उपदान सेवानिवृत्तीनंतर अदा करण्यात येत असल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर शासकीय निवासस्थानामधील वास्तव्यापोटी उद्भवणाऱ्या शासकीय येण्याची वसूली उपदानामधून करता येत नाही. यास्तव, सेवानिवृत्तीच्या वेळी शासकीय निवासस्थानात वास्तव्यास असलेल्या भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी, शासकीय निवासस्थान ३ महिन्याच्या कालावधीत रिक्त करणार असल्याबाबतचे हमीपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयाकडे देण्याची व त्याआधारे सार्वजनिक बांधकाम विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

उपरोक्त बाब विचारात घेता, भा.प्र.से. अधिकारी सेवानिवृत्तीवेळी शासकीय निवासस्थानात वास्तव्य करीत असल्यास सेवानिवृत्तीनंतर ३ महिन्याच्या कालावधीत ते शासकीय निवासस्थान रिक्त करत असल्याबाबतचे हमीपत्र सेवानिवृत्तीपूर्वी त्यांनी प्रशासकीय विभाग/ कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयाकडे सादर करावे. सदर हमीपत्र

Scanned with CamScanner

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर व संबंधित अधिकाऱ्याकडे शासकीय निवासस्थानापोटी कोणतीही थकबाकी नसल्याची खातरजमा केल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संबंधित प्रशासकीय विभागास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे. संबंधित प्रशासकीय विभाग/ कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी ना-हरकत प्रमाणपत्राची नोंद संबंधित अधिकाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये घेऊन अद्यावत सेवापुस्तकासह सहायक संचालक (लेखा), सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन ९-अ यांच्याकडे पाठवावे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर निवृत्तीवेतनादी लाभ प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्यांचा सांकेतांक २०२३०८०२१३१५५८८२०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL GANGARAM GANGARKAR

Dig'tally signed by SUNIL GANGARAM GANGARKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F9613C315644DFDC2C9D1B7756FDB444DB76376B01E337B8015FCF7DA90A4CFD, cn=SUNIL GANGARAM GANGARKAR
Date: 2023.08.02 13:17:39 +05'30'

(सु. गं. गांगरकर)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मंत्रालयीन सर्व भा.प्र.से. अधिकारी,
२. सर्व जिल्हाधिकारी कार्यालये,
३. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांच्या अधीनस्त येणारी सर्व महामंडळे यांना संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
४. सर्व जिल्हा परिषद कार्यालये,
५. सर्व विभागीय आयुक्त कार्यालये,
६. सर्व महानगरपालिका कार्यालये,
७. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन ९, कार्यासन १०, कार्यासन १०-अ, मंत्रालय, मुंबई ३२
८. निवड नस्ती.



Scanned with CamScanner